# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०२०/३८६

दिनांक : 18 MAR 2020

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित पदविका/पदवी/पदयुत्तर पदवी

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

विषयः **कॉर्स (CORS) स्टेशन स्थापन करणेबाबत.**

संदर्भः १) मा.मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. अ.शा.प.क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.अ ४५/ल-१, दि. २६ फेब्रुवारी २०२०

२) मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१९/सं.क्र.२३५/आस्था-२, दिनांक ०३ मार्च २०२०

३) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/संकिर्ण/ २०२०/८९, दिनांक ०४ मार्च २०२०

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित शासनपत्र व संचालनालयाच्या पत्रांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील सर्व गावांच्या गावठाणांमधील जमिनींचे **GIS** आधारित सर्वेक्षण व भूमापन करण्यासाठी शासकीय व निमशासकीय संस्थांच्या आवारामध्ये कॉर्स स्टेशन उभारणीकामी व कॉर्स **(CORS)** च्या सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन आवश्यक ती जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही व सहकार्य करावे. अधिक माहितीसाठी उपरोक्त संदर्भीय शासन पत्र व संचालनालाच्या पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

सोबत : उपरोक्त प्रमाणे

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९४३६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

पत्र क्रमांक : १६/आस्था/संकिर्ण/२०२०/८९ दिनांक: ४/३/२०२०

प्रति,
१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : **कॉर्स (CORS) स्टेशन स्थापन करण्याबाबत.**

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्रमांक संकीर्ण-२०१९/सं.क्र.२३५/आस्था-२,
दिनांक ३.३.२०२०

उपरोक्त विषयाबाबतच्या शासनाच्या संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शासन पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांना आपल्या स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही व सहकार्य करण्याच्या सूचना द्याव्यात.

(प्र.अं. नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६
Email: do.asthahte-mh@gov.in

क्र:संकीर्ण-२०१९/सं.क्र.२३५/आस्था-२
४३१ विस्तार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२

दिनांक: ०३ मार्च, २०२०.

प्रति,

संचालक (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/कला/ग्रंथालय)
पुणे/मुंबई

श्रो शर्मिला
श्री गोस्वामी
313

विषय : कॉर्स (CORS) स्टेशन स्थापन करण्याबाबत...

उपरोक्त विषयाचे सोबत जोडलेले महसूल व वन, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२०चे पत्र कृपया पहावे.

२. सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या अधिपत्याखालील कार्यालय/महाविद्यालय/विद्यापीठमधील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक ती कार्यवाही व सहकार्य करण्याच्या सूचना द्याव्यात.

३/३/२०२०
(अमोल उगलमुगले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
उपसचिव (मशि/विशि/तांशि/साशि/कला), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

अ.शा.प. क्र. संकीर्ण-२०२०/ प्र.क्र. ४५/ल-१
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दि. २६ फेब्रुवारी, २०२०

अजोय मेहता
मुख्य सचिव

**विषय - कॉर्स (CORS)स्टेशन स्थापन करणेबाबत.**

प्रिय श्री./श्रीम.

राज्यातील सर्व गावांच्या गावठाणांमधील जमिनींचे GIS आधारित सर्वेक्षण व भूमापन करण्याबाबतची योजना ग्रामविकास विभाग, जमाबंदी आयुक्त व भारतीय सर्वेक्षण विभाग, डेहराडून यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाच्या दि.२२/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने राज्यातील गावठाण भूमापन न झालेल्या अंदाजे ४०,००० गावांचे सर्व्हे ऑफ इंडिया यांचे सहाय्याने गावठाण भूमापन करण्यात येत आहे. या प्रकल्पाचा भाग म्हणून राज्यात एकूण ७७ ठिकाणी कॉर्स (CORS - Continuously Operating Reference Station) GPS स्टेशन उभारणीचे काम करण्यात येणार आहे.

२. कॉर्स (CORS)स्टेशन स्थापित करण्यासाठीचे निकष याबाबतची माहिती व मार्गदर्शक सूचना सर्व जिल्हाधिकारी व उपसंचालक भूमि अभिलेख यांना जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी दि.११/१२/२०१९ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

३. राज्यातील सर्व गावांच्या गावठाणांमधील जमिनींचे GIS आधारित सर्वेक्षण व भूमापन करण्यासाठी शासकीय व निमशासकीय कार्यालयाच्या आवारामध्ये कॉर्स स्टेशन उभारणीकामी आवश्यक ती जागा उपलब्ध करुन देण्याबाबत व CORS च्या सुरक्षेबाबत आपल्या अधिनस्त कार्यालयांस आवश्यक ती कार्यवाही व सहकार्य करणेबाबत कळविणे आवश्यक आहे.

आपला स्नेहांकित,

(अजोय मेहता)

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
(गृह विभाग, ग्रामविकास विभाग,
वने विभाग, शालेय शिक्षण विभाग,
सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
कृषी विभाग, उच्च तंत्रज्ञान विभाग)

दूरध्वनी : कार्यालय २२०२ ५० ४२/२२०२ ८७ ६२, फॅक्स : २२०२ ८५ ९४, ई-मेल : cs@maharashtra.gov.in